# तो राजहंस एक.....

स्मिता भागवत. कॅनडा.

मे महिन्यात भारतात त्सुनामी वाटण्याजोगा बदलाचा झंझावात आला. माझी स्मृतीमंजुषा ढवळून काढणारा! देह कॅनडात नि मन गुजरातेत, असे झाले. माझा जन्म नि शिक्षण बडोदे - गुजरातेत झाले. मुळात तिथे गायकवाड राज्यकर्ते होते. सयाजीराव (तिसरे) महाराजांच्या कर्तृत्वामुळे त्यास सयाजीनगरी म्हणत. त्यांच्या गुणग्राहकतेमुळे तिथे खूप इतर भाषक गुणीजन होते. त्यात मराठी नामवंतांची संख्या मोठी होती. म्हणून त्यास गुजरातचे पुणेही म्हणत. राज्याची अधिकृत भाषा गुजराती असली तरी तिथे सिंधीसह सर्व भाषकांच्या उत्तम शाळा होत्या. मी शाळेत मराठी नि कॉलेजात इंग्रजी माध्यमात शिकले. त्या बडोदे नगरीतील बहुतेकांना गुजराती-मराठी दोन्ही भाषा येत असत. माझ्या मनात मात्र विनाकारण गुजराती भाषेविषयी आकस होता. म्हणून मी गुजराती शिकले नव्हते.

मी पट्टीची वाचक! साहित्यात पाऊलखूण उमटावी या इच्छेने झपाटलेली! थोडे-फार लिहू लागलेली! पण मला गुजराती अजिबात आवडत नसे. यास बालिशपणा समजून गुजराती लोक माझ्याशी मराठीत बोलत. अशा वेळी माझ्या वडीलांना गुरुस्थानी असलेल्या अमदावादच्या स्वातंत्र्यसेनानी मित्राने आपल्या मुलासाठी मला मागणी घातली. स्वातंत्र्यपूर्व काळातील संबंध ताजे करण्याचा हा विचार माझ्या वडीलांना पसंत पडला. लग्नाआधी आम्ही अवश्य भेटलो नि तेव्हा आम्हाला एकांत भेटीची संधी देण्यात आली होती. पण आम्ही ज्येष्ठांच्या परिचयास जमेस धरून ती नाकारली. त्यामुळे एक मेख लग्नानंतर कळली. स्वातंत्र्यपूर्व काळात सरदार पटेलांचा उजवा हात असलेले माझे सासरे गुजरातच्या सुणाव नावाच्या खेड्यात राष्ट्रीय शाळा चालवत. म्हणून त्यांच्या मुलास मराठीचा म माहित नव्हता. मला गुजरातीचा गंध नव्हता. माझे संवादावर माझे नितांत प्रेम असल्याने मला गुजराती शिकावे लागले.

आमच्या सोसायटीत उमाशंकर जोशी, नगीनदास पारेख, रमणलाल सोनी या नामवंत साहित्यिकांचे वास्तव्य होते. स्वातंत्र्याच्या लढ्याच्या काळात साऱ्यांची माझ्या वडीलांशीही मैत्री झाली होती. त्यांच्या रुपाने मला सासरी माहेर लाभले. सासरी गुजराती वातावारणात माझी घुसमट होत होती. म्हणून त्यांनी मला गुजराती शिकवण्याचा चंग बांधला. भाषा समृद्ध करण्यासाठी अभिजात गुजराती साहित्याचा खजिना माझ्यासमोर धरला. ज्याची एक भाषा चांगली असते त्यास कोणत्याही भाषेत व्यक्त होता येते, असे सांगून त्यांनी मला गुजरातीत लिहिण्याच्या भरीस घातले. पूर्वाश्रमात गुजरातीचा गंध नसलेल्या मला, त्यांनी गुजराती लेखिकेच्या कक्षेस पोहोचवले.

पुढे आघाडीच्या गुजराती नियतकालिकात माझे लिखाण दिसू लागले. लहान-थोर स्थानिक साहित्यिकात वावर सुरू झाला. त्यात होता एक तरुण कवी! नरेंद्र नावाचा! शब्दांवर हुकूमत नि वर्तनात कवी समाजात अपवादाने दिसणारा ठामपणा असलेला! अनिष्ट परिस्थितीतून प्रयत्नाने वर येत असलेला! मी कविता करत नसले तरी वेगळ्या वाटणाऱ्या त्याच्या कविता मला आवडत. कवितेच्या माध्यमातून तो स्वतःचा परिचय देतो, असे मला वाटे. आमचा विशिष्ट गट तेव्हा साहित्य मंदिराच्या पहिल्या पायरीवर उमेदवारी

करत होता. एकमेकांच्या मदतीने गुणवत्ता सुधारण्याचा आमचा प्रयास असे. आपल्या-तुपल्या गप्पा, एकमेकांची खेचणेही घडे. कधी कुणाच्या आर्थिक परिस्थितीविषयी असूया किंवा अनाठायी दया प्रगट होत नसे. कुणाचेही काही छापून आले की त्याच्यापाशी खारीसिंग (खारेदाणे) मागून पार्टीचा आनंद उपभोगला जाई. नरेंद्रभाईंकडे मात्र मुद्दाम चहाची मागणी होई. त्यात हल्ली विरोधापक्ष त्यांचा उल्लेख चहावाला, करत तो कुत्सितपणा अर्थातच नसे. अनौपचारिक गप्पातून प्रत्येकाचा अतीत उलगडत जात असे. नरेंद्रभाई वेगळ्या वातावरणातून आले असल्याने त्यांच्या अतीतात रोचक घटनांचा समावेश होता.

वडनगर या गुजरातच्या सामान्य गावात अतिसामान्य चहावाल्याच्या घरात त्यांचा जन्म झाला होता. घरात कष्टमय जीवनशैली असली तरी बुद्धिस चालना देणारे वातावरण नव्हते, सुदैवाने वडनगरातील एकमेव मराठी व्यक्ति काशीनाथ दामले या तरुणाशी त्यांचा परिचय झाला. दामल्यांनी या शाळकरी मुलास वाचनाचे वेड लावले. पूर्वी वडनगरात गायकवाड सरकारचे राज्य असल्याने, तिथे उत्तम वाचनालय होते. आध्यात्मिक वाचनामुळे त्यांना हिमालयात वास्तव्य करण्याची इच्छा झाली आणि ते गेलेही. पण थोड्याच काळात त्यांचा भ्रमनिरास झाला. हिमालयात संधीसाधू समाज भेटल्यामुळे नरेंद्रभाईं हिमालयाचा निरोप घेतला. सुदैवाने परत एका ज्येष्ठ सातारकराची गाठ पडली. ते होते बडोदे नगरीतील नाणावलेले वकिल लक्ष्मणराव इनामदार. त्यांनी नरेंद्रभाईंच्या मनात शिक्षणाचा आग्रह रुजवला. आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन बाहेरून अभ्यास करून (एक्सटर्नल) पदवी घेण्याची भलावण केली. त्यामुळे नरेंद्रभाई पोलिटिकल सायन्स या विषयात एम.ए. करू शकले. त्यांच्याविषयी आदर असल्यामुळे पुढे संघाचे सक्रिय कार्यकर्ते झाले. आणीबाणीच्या काळात गुजरात आणि तामिळनाडू या राज्यात कार्यकर्त्यांच्या कामाने वेग घेतला आणि प्रचारक नरेंद्रभाईंचे व्यक्तिमत्व तेजाने झळाळू लागले.

हिमालयात जाण्याच्या निमित्ताने वडनगरचा निरोप घेतलाच होता. डिटर्मिनेशन, डेडीकेशन आणि डिसिप्लीन या मजबूत तिपाईवर त्यांचे व्यक्तिमत्व विकसित होऊ लागले. ते कवी आणि पत्रकार! पोलिटिकल सायन्सच्या अभ्यासामुळे ठामपणे विचार मांडण्यात माहिर! त्यांच्या शब्दातूनच नव्हे, मौनातूनही कणखरपण जाणवे. आमच्या नवशिक्या साहित्यिकांच्या गटात ते हिरीरीने विचार मांडत. त्यांच्या डोळ्यात नि शब्दात तेव्हाही तेजाची ठिणगी जाणवत असे. निखळ कार्यकर्त्याने लग्न करू नाही, असे ते म्हणत. पण तसे वागण्याची संधी त्यांना मिळाली नव्हती. लहान वयात त्यांचे लग्न झाले होते. अशा लग्नात मुलगी वयात येईतो माहेरी राहते. त्यांची पत्नी वयात आली तेव्हा तिला नवऱ्याची विचारशैली कळली. पत्नीस कार्यातील अडचण समजणाऱ्या सहचराच्या (?) पायीची वहाण होऊन लाचार जीवन जगणे त्या मानिनीस पटले नाही. नांदायला सासरीजाण्यास नकार देऊन ती प्राथमिक शाळेत शिक्षिका झाली. कुणाच्या व्यक्तिगत जीवनात नाक खुपसणे मला आवडत नाही. तरी या अपरिचित बाणेदार स्त्रीचे मला कौतुक वाटे. अस्मिता जपणाऱ्या या स्त्री विषयी प्रसंगी मी आदर व्यक्त करत असे.

पुढे जीवनप्रवाहाने अमदावादचा थांबा ओलांडला. तरी अमदावादचा संबंध संपणे अशक्य होते. पण येणे-जाणे धावपळीत! मित्र परिवारास भेटणे कधी जमे तर कधी नाही. नवऱ्याच्या बदलीच्या नोकरीत आमचे

भ्रमण चालू होते. गुजराती बरोबर मराठी भाषेतही लेखन होऊ लागले तरी मित्र परिवाराच्या गाठी-भेटी कमी होत होत्या. उमेदवारी करणाऱ्या जवळपास सर्वांची स्थापित साहित्यिकात गणना होत होती. मात्र नरेंदभाईंच्या कवी मानसावर राजकारण अधिक हावी होऊ लागले होते. त्यांच्या कार्याचा परीघ वाढत होता. समर्थास घरी-दारी शत्रू निर्माण होतात, यास ते अपवाद नव्हते. कणखर मन आणि दृढ आत्मविश्वास त्यांना चौफेर लढण्याचे बळ देई. व्यस्त जीवनातून वेळ काढून मैत्री जपणेही ते जमवत होते. सयाजीराव महाराजांविषयी त्यांच्या मनात नितांत आदर! त्या संदर्भात आम्ही मराठी, गुजराती आणि इंग्रजी या तीन भाषेत पुस्तके प्रकाशित केली तेव्हा त्यांनी आसुसून मदत केली. समर्थ रामदास-शिवाजी महाराजांच्या संबंधावर मी गुजराती कादंबरी लिहिली तेव्हाही! काँग्रेसच्या राजवटीत भारतीय क्रांतीकारी समाजाचे पितामह श्यामजी कृष्ण वर्मा नि त्यांच्या पत्नीच्या अस्थी पन्नासहून अधिक वर्षे जिनिव्हात बँकेच्या लॉकरमध्ये उपेक्षिताचा अपमान सोसत होत्या. त्यांना सन्मानाने भारतात आणून नरेंद्रभाईंनी वाजत गाजत गुजरातेते नेले, तेव्हा माझा ऊर आनंदाने भरून आला होता. ‘सावन घन बरसे’ या कादंबरीच्या संदर्भात अभ्यासासाठी वडनगरला गेले तेव्हा नरेंद्रभाईंचे कार्य पाहून जीव कमालीचा सुखावला होता.

निवडणुकीच्या संदर्भात त्यांचे भाषण ऐकताना, एकदा भारतात मी आमच्या मैत्रीच्या संदर्भात काही बोलले. तेव्हा एकाने कुत्सितपणे विचारले, “इतक्या उच्च पदावर पोचलेल्या व्यक्तीच्या अजून ती मैत्री स्मरेल, असे समजणे भाबडेपणा नाही वाटत?“ मला हा प्रश्न पडत नाही. त्यांना विस्मरण होईल, असेही वाटत नाही. तसे घडले तरी मैत्रीकाळातील संस्मरणे होत्याची नव्हती होत नाहीत. काळाच्या ओघात भेटी प्रासंगिक ठरल्या तरी मैत्रीस ओहोटी लागत नाही, असे मला वाटते. मित्र परिवाराच्या प्रगतीचा चढता आलेख पाहणे माझ्या आनंदाचा भाग असतो. नरेंद्रभाई त्यास अपवाद का असावेत? नरेंद्रभाई पंतप्रधान झाले, याचा आनंद व्यक्त करण्यास आमच्या जुन्या गटातील लेखकाचा फोन आला. सुहृदापाशी व्यथा व्यक्त व्हावी, तसा माझ्या ओठी ‘तो’ कुत्सित प्रश्न आला. तेही म्हणाले, “आपल्याला पंतप्रधानाकडून काहीही फोवर नको आहे. म्हणून असे प्रश्न हसून उडवून लावावेत. मी अजून पत्रकारितेच्या क्षेत्रात आहे. कामाच्या संदर्भात कधी दिल्लीस जाणे झाले फार तर मला वाटेल - नरेंद्रभाईंकडून एक चहा उकळववावा.“

मला हे पटते. राजकारण माझा प्रांत नाही. महाराष्ट्राच्या टोकाच्या भ्रष्टाचाराने निर्वासिताची कळा आणून मला या मित्र वर्तुळापासून देहाने हजारो मैल दूर फेकले. तरी स्वातंत्र्यसेनानीच्या कन्येस तसेच सुनेस राजकारण्यांकडे कसलीही भीक मागायची नाही. मित्राच्या व्यस्त जीवनातील काही क्षण मागण्याचा आग्रह धरणे मला हेतुशून्य अट्टाहास वाटतो. मैत्रीचे मोजमाप भेटींच्या संख्येवर करावे, असे मला कधीच वाटत नाही. निखळ मैत्री भेट आनंदाची ठरवत असली तरी ती गरजेची बाब मात्र नसते, हे माझे प्रांजळ मत!

भारतातच नव्हे सर्वत्र, गगनाला गवसणी घालणाऱ्या यशस्वी व्यक्तींचे पाय ओढणारे खूप असतात. नरेंद्रभाई स्वतःस बॉर्न सी.एम. ऑफ गुजरात म्हणवतात. सी.एम. म्हणजे कॉमन मॅन, हे ते आवर्जून सांगतात. पूर्वजांच्या कर्तृत्वाचा नि श्रीमंतीचा टेंभा मिरवणाऱ्या सेलिब्रीटींच्या प्रभावातून देशाने मुक्त व्हावे आणि देशात खऱ्या अर्थाने लोकशाही यावी, असे हल्ली खूप लोकांना वाटत आहे. सामान्यांची एकजूट

झाली तर हे असामान्य काम घडेल. जनता जनार्दनाच्या मदतीने ते घडवण्याची क्षमता नरेंद्रभाईंच्यात आहे. कुसुमाहून मृदू असलेल्या कवीच्या हृदयास प्रसंगी वज्राहून कठोर होऊन देशाच्या प्रगतीचा आलेख गगनास भिडवण्याचे सामर्थ्य लाभो, अशी मी मनोमन प्रार्थना करते. नजीकच्या भविष्यात त्यांच्या विषयीचे पूर्वग्रह दूर होऊन त्यांना जनतेचा सहकार लाभावा, यासाठी शुभचिंतन! हे शुभचिंतन केवळ मैत्री पोटी नाही. लोकांनी त्यांना ढाण्या वाघाची उपमा दिली. ते अन्याय करणार नाहीत नि चालवूनही घेणार नाहीत, असे सर्वांना वाटते. मी भ्रष्टाचारापायी देशापसून दूर फेकली गेले तसा प्रसंग नरेंद्रभाईंच्या कारकीर्दीत कुणावर कोसळणार नाही, अशी मला आशा नव्हे खात्री वाटते. त्यासाठी कर्मयोगी नरेंद्रभाईंना दीर्घायु लाभावे, अशी माझी प्रार्थना आहे. भारतीय नागरिकांना भ्रष्ट-इष्ट यातील फरक कळावा आणि देशात समंजस लोकशाही यावी अशीही! देशास स्वातंत्र्य मिळावे, यासाठी लाठीमार नि कारावास सोसलेल्या पित्याच्या कन्येने नि सुनेने देशाच्या उन्नतीसाठी केलेली ही प्रार्थना आहे. उत्तम कार्यासाठी ईश्वरास सक्षम व्यक्तीचे माध्यम वापरावे लागते. तशा माध्यमासाठी या सक्षम सन्मित्रावर ईश्वराने पसंतीची मोहोर मारावी. कावकाव करणाऱ्या निष्क्रिय कावळ्यांवर मात करून, आपण बदकाचे वेडे पिल्लू नसून राजहंस आहोत, हे सिद्ध करण्याची क्षमता आणि संधी नरेंद्रभाईंना लाभो. नजीकच्या भविष्यात त्याच्या मार्गदर्शनाखाली देशात सुवर्णकाळ अवतरो.

देशापासून हजारो मैल दूर असले तरी मनाने देशाच्या या आनंदात सहभागी आहे. म्हणून कलशात सागर सामावतो तसे ज्यात भरतभूमीच्या नव्या पंतप्रधानांचे समग्र व्यक्तिमत्व प्रतिबिंबित होते, असे मला वाटते, त्या कवितांचे त्रिदल, मुक्तछंदात अनुवाद करून या आनंदाच्या प्रसंगी मी मराठी रसिकांना भेट देत आहे.

## खुमारी

प्रारब्धाचा विचार मी का करावा, मी आव्हान पेलणारा माणूस आहे.

तेज उसने घेत नसलेला, स्वतः जळून उजेड निर्माण करणारा दीप आहे.

झळझळीत प्रकाशाचा मला मोह नाही, आत्मदीपाचा प्रकाश मला पुरेसा आहे

धूसर धुक्यात मला रस नाही, मी नखशिखांत निखालस माणूस आहे

प्रारब्धास कधीच भीक न घालणारा, मी आव्हान पेलणारा माणूस आहे

कुंडलीच्या गुंत्यात मी अडकत नाही, की कुंडलीसमक्ष मी झुकतही नाही

भेदरट भ्याडांच्या सारीपाटावर सोंगट्या हलवणे मला कधी आवडत नाही

मी माझा वंशज आणि मीच माझा वारस, प्रारब्धास जो जुमानत नाही, दोस्तांनो

यातच लागतोय माझ्या प्रयत्नांचा कस, यातच लागत राहिल माझ्या प्रयत्नांचा कस!!!!

## दोस्त जीवनाचे

आम्ही जीवनाचे दोस्त आहोत, आम्ही साक्षात प्रेम आहोत
आम्ही मनःपूत उडणारे आणि सागरात आसुसून डुंबणारे
आम्ही पहाडावरील सूर्य आहोत, मध्यरात्री उगवणारे
आम्हाला अभिनिवेशाची आस नाही की कुणाची भीडभाड नाही
शहाणे आम्हाला वेडे समजतात नि वेडे आम्हाला शहाणे म्हणतात
ते सारे खरे आहेत आणि आम्हीही खोटे नाही आहोत
मुक्त जीवनसागर उसळतो आहे आम्ही डबक्यातले बुडबुडे नाही
आम्ही दर्याची मझधार आहोत, आम्हाला मुळी किनाराच नाही
आम्ही जीवनाचे दोस्त आहोत, अहो आम्ही साक्षात प्रेम आहोत.

## कर्मयोग्याचा जीवनधर्म

टोळ्यांचे मेळाव्यात रुपांतर करणे, माझे कर्म नसून जीवनधर्म आहे
मानसिकता माझी ‘आहे’ म्हणणाऱ्याची आणि ‘नाही’स नकार देणाऱ्याची
आणि कोसळणारी इमारत सावरण्यास आवर्जून टेकू देणाऱ्याची
इतरांपाशी असतील राघव माधव, मला आकर्षण कर्मयोग्याच्या साधनेचे
थकल्या कार्यरत देह-मनाला रिझवू शकणाऱ्या सुरेल समर्थ वेणूचे
आणि नेट लावून आव्हान पेलणाऱ्या शिवधनुष्याचे
मी ना ईश्वर की मी ना सैतान, प्रिय मला मानवत्व, तेच माझे ध्येय आहे
मला ना स्वर्गाची आस की नरकाचे भय, कारण जमीन माझी जहागीर आहे,
श्वसतो मी ज्या भूमीवर, तिथे मला नंदनवन फुलवायचे आहे
टोळ्या टळाव्यात नि मेळावे भरावेत, हे माझे स्वप्न नव्हे ध्येय आहे
या ध्येयाच्या पूर्तीसाठी मी तनमन झिजवतो आहे, दोस्तांनो
टोळ्यांचे मेळाव्यात रुपांतर करणे, हा माझा जीवनधर्म आहे


गुजरातच्या भरुच (ज्यास मराठी लोक भडोच म्हणतात)येथिल के.जी. चोकसी वाचनालयाच्या संचालकांनी नव्या पंतप्रधानांना अभिनव मानवंदना दिली आहे. या खंड प्राय देशाच्या अनोख्या पंतप्रधानाचा परिचय घडवण्यासाठी त्यांनी श्री. नरेंद्र मोदी लिखित आणि त्यांच्या संदर्भात इतरांनी लिहिलेल्या पुस्तकांचे प्रदर्शन जनतेसाठी खुले केले आहे. त्यामुळे कवी आणि साहित्यिक म्हणून आपले पंतप्रधान कसे आहेत, ते जनतेस कळावे यासाठी केलेला हा प्रयत्न खूप लोभस आहे.

भारताची उन्नती करून सुवर्णयुग आणण्यास भरतभूमीच्या या सुपुत्राला यश मिळो. शुभं भवतु. वंदे मातरम्! जय हिंद!

smitacap@gmail.com

1 289 752 8885

श्री. नरेंद्र मोदी - भारताच्या पंधराव्या पंतप्रधानांना भरुच येथील के.जी. चोकसी वाचनालयाच्या संचालकांकडून अनोखी मानवंदना.



के. जे. चोकसी वाचनालय भरुच येथील पुस्तक प्रदर्शनातील पुस्तके.

